# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सायंकाळ)

जा.क्र. ४५०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—३०/०७/२०१६.

**१) ट्रॅक्टरची मोटार सायकलला धडक दिल्याने, दोन गंभिर जखमी . :—**

दिनांक १७/०७/२०१६ रोजी २०.०० वा. दर. यातील फिर्यादी दयाराम लघुजी मेश्राम वय ६७ वर्ष, रा. साकोली यांचा मुलगा प्रफुल मेश्राम वय ३८ वर्ष, व त्याचा मित्र लोकेश शरद नांदगावे वय २२ वर्ष, रा. केसोरी हे मोटार सायकल क्र. एमएच ३५ ९११४ होन्डा गाडीने तुमसर कडुन साकोली कडे येत असता एकोडी गावातुन आरोपी ट्रॅक्टर चालकाने आपल्या ताब्यातील ट्रॅक्टर भरधाव वेगाने व लापरवाहीने चालवुन मोटार सायकलला एकोडी गावात जाणारा टी पॉईट रोडवर धडक देवुन मो.सा वरील दोन्ही इसमांना जखमी करण्यास कारणीभुत झाला. व अपघाताची सुचना न देता पडुन गेला असे फिर्यादी यांचे लेखी व डॉ.रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३३७,३३८ भादंवि सहकलम १३४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भजने पो. स्टे. साकोली हे करीत आहेत.

**२) विवाहीतेचा शारीरीक व मानसीक छळ. :—**

सन २०१० ते ११/०७/२०१६ पर्यन्त. यातील फिर्यादी ही आरोपीची लग्नाची पत्नी असुन तिला ''तुझ्या वडीलाला घराचा हिस्सा मांग'' असे म्हणुन शिविगाळ व मारपिट करुन जिवाने मारण्याची धमकी देवुन तीचा मानसीक व शारीरीक छळ केल्याने फिर्यादीचे रिपोर्ट व महीला समुपदेशक केन्द्र भंडारा यांचे पत्र प्राप्त झाल्याने पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४९८(अ),५०४, ५०६ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. महालगावे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

३) बिना परवाना औषधउपचार करतांना लोकांची फसवणुक केल्याने गुन्हा . :—

दिनांक २९/०७/२०१६ रोजी १६.३० वा. दर. यातील आरोपी यांचे कडे वैद्यकिय व्यवसाय करण्याचा प्रमाणपत्र नसतांना सुध्दा आपले क्लीनीक मध्ये ॲलोपॅथीक, होमीओपॅथीक व आयुर्वेदीय औषधाचा साठा बाळगुण रुग्णांवर उपचार करतांना व त्याचे पथकास बिना वैद्यकीय प्रमाणपत्र वैद्यकीय व्यवसाय करतांना लोकांची फसवणुक केल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ४१९,४२०,४६८,४७१ भादंवि सहकलम ३३,३६ महा. वैद्यकीय व्यवसाय अधि. १९६१ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. नंदेश्वर पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

( श्री.बी.आर.गाडे)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५१०११११२

३०/७/१६

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.